बाब क्र. १ :

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २०८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ६ ऑगस्ट, २००४ (शुक्रवार) |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.अरुण कुमार मागो<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन.रामाराव<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

निमंत्रित :

श्री.विश्वास धुमाळ
प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक

श्री.के.आर.चौधरी
संचालक (अभियांत्रिकी सेवा),
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
विशेष कार्यकारी अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.के.रा.घोरपडे
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ मे, २००४ रोजी झालेल्या २०७ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ मे, २००४ रोजी झालेल्या २०७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालातील बाब टिप्पणीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आला :-

**बाब क्र.१४ : अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी पथक स्थापन करणे.**

अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेची (एमआरटीएस) अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी पथक स्थापन करणे, यासंबंधात अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, या पथकामध्ये प्रकल्प अधिकारी म्हणून श्री.मदान यांची नेमणूक करण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली होती. तथापि, या पदनामात बदल करुन संचालक (एमआरटीएस) म्हणून श्री.मदान यांची नेमणूक केली आहे. कार्यकारी समितीने या पदनामातील बदलास मान्यता दिली.

२.२ त्यानंतर, वरील बदलासह कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलात इराणियन कॉन्सुलेटच्या कार्यालय व निवासस्थानाकरीता २००० चौ.मी. चा भूखंड उपलब्ध करुन देणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, इराणियन कॉन्सुलेटने महाराष्ट्र शासनाकडे वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये २००० चौ.मी. चा भूखंड कार्यालय व निवासस्थानाकरीता उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. यासंबंधात महानगर आयुक्तांनी पुढील गोष्टी नमूद केल्या - (अ) वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मान्यताप्राप्त आराखडयानुसार प्राधिकरणातर्फे "जी" ब्लॉकमध्ये एक आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र विकसित करण्यात येत आहे. या केंद्रामधील विविध भूखंडाचे वाटप प्राधिकरणाने ठरविलेल्या जमीन वाटप विषयक धोरणानुसार आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्राशी संबंधित कार्यासाठी जसे विविध कार्यालये, वित्तीय संस्था, स्टॉक एक्सचेंज वगैरे यासाठी करण्यात येते. इराणियन कॉन्सुलेट ही संस्था आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्राच्या संबंधित आढळून येत नाही, (ब) वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी", "जीएन" व "जीटेक्स" ब्लॉकमधून विकसित जमिनीपैकी वाणिज्यिक वापरासाठी उपलब्ध क्षेत्रफळाच्या अंदाजे ५८ टक्के क्षेत्रफळाच्या भूखंडांचे वाटप झालेले असून अमेरिकन

कॉन्सुलेटला सुमारे ४०४७० चौ.मी. क्षेत्रफळाचा एक मोठा भूखंड याआधीच वाटप केला आहे. वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्र विकसित करणे हे मूळ उद्दिष्ट असल्याने व वाणिज्य वापरासाठी आता मर्यादित भूखंड शिल्लक असल्याने या परिसरात आता नव्याने कोणत्याही कॉन्सुलेटला भूखंड देणे योग्य ठरणार नाही, (क) तसेच वांद्रे-कुर्ला संकुलात अनेक बँका, वित्तीय संस्थांची कार्यालये सुरु आहेत तर काहींच्या इमारती नजीकच्या काळात पूर्ण होतील. तसेच याच क्षेत्रात करमणूक केंद्र, सांस्कृतिक केंद्र, संमेलन व प्रदर्शन केंद्र, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे इनडोअर क्रिकेट प्रशिक्षण केंद्र यासारखी जनतेला मोठया प्रमाणावर आकृष्ट करणारी विकसने प्रस्तावित आहेत. अमेरिकन कॉन्सुलेटला भूखंड वाटप केल्यानंतर हा परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अति संवेदनशील समजण्यात येत आहे व त्यामुळे या परिसरात कोणत्याही कॉन्सुलेटला यापुढे भूखंड देणे म्हणजे येथील सुरक्षिततेची संवेदनशीलता आणखी वाढविणे असा होईल आणि त्याचा विपरित परिणाम या परिसरातील कार्यालयांना भेटी देणा-या जनतेवर होईल. त्यामुळे आता यापुढे वांद्रे-कुर्ला संकुलात कोणत्याही इतर कॉन्सुलेटला भूखंड देणे योग्य होणार नाही.

३.२ यासंबंधात चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामध्ये वाणिज्यिक वापरासाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्यामुळे यापुढे वांद्रे-कुर्ला संकुलात कोणत्याही इतर कॉन्सुलेटला भूखंड देण्यात येऊ नये.

**<u>बाब क्र.४</u> : <u>मरीन ड्रॉईव्ह परिसराच्या पुनर्नूतनीकरणाकरीता संकल्पचित्र व देखरेखीच्या सल्लामसलतसाठी सल्लागाराची नेमणूक करणे.</u>**

४.१ ही बाब विचारार्थ घेण्याआधी ज्या सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावांचे मूल्यमापन सुयोग्य (responsive) ठरविण्यात आले अशा पुढील ३ सल्लागारांनी त्यांच्या पुनर्नूतनीकरण प्रस्तावांचे सादरीकरण केले – (अ) श्री.रतन जे.बाटलीबॉय आणि श्री.संजीव मल्होत्रा, (एआरसी), मुंबई, (ब) श्री.प्रदीप सचदेव, प्रदीप सचदेव डिझाईन असोसिएटस्, नवी दिल्ली आणि (क) श्री.बिमल पटेल, एन्व्हार्नमेंटल, प्लॅनिंग कोलॅबोरेटीव्ह, अहमदाबाद.

४.२ सादरीकरणानंतर सल्लागाराची निवड करण्यासाठी वापरलेली पध्दत विशद करताना महानगर आयुक्तांनी सांगितले की, मुंबई टास्क फोर्स यांनी सुचविल्यानुसार वास्तुशास्त्रज्ञ आणि अर्बन डिझाईनर्स

यांच्याकडून सार्वजनिक जाहिरातीद्वारे स्वारस्य देकार (Expression of Interest) मागविण्यात आले. अशा प्रस्तावांच्या आधारे सल्लागाराची निवड यादी तयार करुन ८ सल्लागारांकडून तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव मागविण्यात आले व त्यापैकी ६ सल्लागारांनी असे प्रस्ताव सादर केले. महानगर आयुक्तांनी नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीने या प्रस्तावांचे मूल्यमापन केले. मे.रतन बाटलीबॉय (एआरसी), प्रदीप सचदेव डिझाईन असोसिएटस् आणि एन्व्हार्नमेंटल प्लॅनिंग कोलॅबोरेटीव्ह यांचे प्रस्ताव सुयोग्य असल्याचे मूल्यमापनात दिसून आले. यानुसार या सल्लागारांचे वित्तीय प्रस्ताव पाहण्यात आले व तांत्रिक प्रस्तावास ८०% गुणवत्ता प्रमाण व वित्तीय प्रस्तावास २०% गुणवत्ता प्रमाण देऊन त्यांचे एकत्रित मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनात, प्रस्ताव सादर करण्याच्या विनंतीमधील (Request for Proposal) अटी व शर्तीनुसार, एन्व्हार्नमेंटल प्लॅनिंग कोलॅबोरेटीव्ह यांना सर्वाधिक गुण म्हणजे ७८.४० (१०० पैकी) प्राप्त झाल्यामुळे मूल्यमापन समितीने या सल्लागाराची नेमणूक करावी अशी शिफारस केली. महानगर आयुक्तांनी असेही निदर्शनास आणून दिले की, जेव्हा हे तिन्ही संकल्पचित्र प्रस्ताव मुंबई टास्क फोर्सला सादर केले तेव्हा त्यांनी मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांनी सादर केलेल्या संकल्पचित्रास सर्वोत्तम दर्जा देऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या सल्लागाराची या प्रकल्पासाठी नेमणूक करण्याचा विचार करावा अशी सूचना केली.

४.३ अशा भिन्न शिफारशींच्या संदर्भात कार्यकारी समितीने या मुद्यावर तपशीलवार विचारविनिमय केला आणि खालील बाबी नमूद केल्या :-

अ) तज्ञ मंडळी सदस्य असलेल्या मूल्यमापन समितीने स्वतःच मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांचा ७८ गुण मिळणारा तांत्रिक प्रस्ताव, एन्व्हार्नमेंटल प्लॅनिंग कोलॅबोरेटीव्ह यांच्या ७३ गुणाच्या व मे.प्रदीप सचदेव डिझाईन असोसिएटस् यांच्या ७१ गुणाच्या प्रस्तावाच्या तुलनेत, सर्वोत्तम ठरविला आहे. एकत्रित मूल्यमापनामध्ये केवळ एन्व्हार्नमेंटल प्लॅनिंग कोलॅबोरेटीव्ह यांची फी कमी असल्यामुळे त्यांना सर्वाधिक म्हणजे ७८.४० गुण प्राप्त झाले आहेत.

ब) मुंबई एक जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी शासनास मदत करण्याची जबाबदारी असलेल्या मुंबई टास्क फोर्सने मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांचा प्रस्ताव ब-याच अतिउत्कृष्ठ मूळ कल्पना असलेला असा तिन्ही प्रस्तावांमधील सर्वोत्तम प्रस्ताव ठरविला आहे.

क) कार्यकारी समितीच्या मते मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांच्या प्रस्तावानुसार मरीन ड्राईव्हचे केवळ पुनर्नूतनीकरण अभिप्रेत नसून मुंबईच्या सर्वात महत्वाच्या आणि प्रसिध्द अशा सार्वजनिक स्थळाला एक भविष्यकालीन दृष्यरुप देणे आणि मुंबई हे जागतिक पातळीवर ठसा उमटविणारे व स्पर्धात्मक शहर म्हणून उदयास येण्यात या स्थळाचा ब्रँड

इमेज म्हणून वापर करण्याचे प्रस्तावित आहे. मरीन ड्राईव्हचा दर्जा व प्रतिमा यावर दिर्घकालीन परिणाम करणा-या व निःशंकपणे उच्च दर्जाचे आराखडे असलेल्या मे.बाटलीबॉय (एआरसी) यांच्या प्रस्तावाची गुणवत्ता केवळ त्यांच्या वित्तीय प्रस्तावाच्या कमी गुणांमुळे दुर्लक्षित करता येणार नाही. यामुळे प्रस्ताव सादर करण्याच्या विनंतीमधील (Request for Proposal) जोडपत्राच्या क्र.३ ची अट डावलून मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांच्या मरीन ड्राईव्ह पुनर्नूतनीकरणाबद्दलचा आराखडा निवडीसाठी विचारात घेणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य ठरेल.

४.४ वरील विवेचनाच्या आधारे कार्यकारी समितीने मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांची मरीन ड्राईव्हच्या पुनर्नूतनीकरणासाठी सल्लागार म्हणून निवड करण्याचा निर्णय घेतला. तसेच मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांनी प्रस्तावितेल्या प्रकल्प खर्चाच्या ४% एवढी फी इतर दोन सल्लागारांनी प्रस्तावितेल्या फी पेक्षा खूप जास्त आहे त्यामुळे वाटाघाटी करुन त्यांची फी सुयोग्य प्रमाणात कमी करावी अशी सूचना कार्यकारी समितीने केली.

४.५ पुनर्नूतनीकरण प्रकल्पाच्या खर्चासंबंधी महानगर आयुक्तांनी सांगितले की, मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांच्या अंदाजानुसार पुनर्नूतनीकरणाचा खर्च सुमारे रु.३० कोटी आणि त्यांच्या आराखडयातील इतर घटकांचा खर्च सुमारे रु.१२२ कोटी असा एकूण खर्च रु.१५२ कोटी इतका आहे. या खर्चापैकी काही हिस्सा प्राधिकरण उचलू शकेल तर उर्वरित हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिकेने उचलणे आवश्यक आहे. महानगर आयुक्तांनी निदर्शनास आणून दिले की, समुद्रतटीय भिंतींच्या दुरुस्तीचा खर्च प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये समप्रमाणात वाटण्यात येतो व या आधारेच मरीन ड्राईव्हच्या पुनर्नूतनीकरण प्रकल्पाचा खर्चही वाटून घेता येईल. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, या प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधिकरण करील परंतु सुधारणा केल्यानंतर या क्षेत्राची उच्च प्रतीची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेवर सोपविली पाहिजे.

४.६ अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मरीन ड्राईव्ह क्षेत्राची सुधारणा करण्याचे काम प्राधिकरणाने मंजूरी दिलेल्या मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा एक भाग असून प्राधिकरण पुनर्नूतनीकरण खर्चाचा काही हिस्सा उचलू शकेल व प्रकल्पाची अंमलबजावणी करु शकेल.

४.७ यासंबंधात चर्चा केल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, पुनर्नूतनीकरणाचा खर्च शक्य तेवढया प्रमाणात खाजगी देणग्यांमधून भागवावा आणि उर्वरीत खर्च प्राधिकरण आणि बृहन्मुंबई

महानगरपालिका यांनी ५०:५० प्रमाणात वाटून घ्यावा तसेच यासंबंधी राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सुयोग्य निदेश द्यावेत अशी शासनास विनंती करावी.

४.८ त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९१७ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम ३ चे पोटकलम (तीन) आणि त्याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मरीन ड्राईव्हच्या पुनर्नूतनीकरणाच्या प्रकल्पासाठी संकल्पचित्र व देखरेख सल्लागार म्हणून मे.रतन बाटलीबॉय (एआरसी) यांची नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मे.रतन बाटलीबॉय यांनी सादर केलेल्या वित्तीय प्रस्तावासंबंधी वाटाघाटी करण्यास तसेच त्यांच्या नेमणूकीसंबंधीच्या अटी व शर्ती ठरविण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** पुनर्नूतनीकरण प्रकल्पाच्या सुमारे रु.३० कोटी खर्चाच्या पहिल्या टप्प्याची कामे, ज्यामध्ये पॅरापिट भिंत, पेविंग, लँडस्केपींग, वॉटर जेट्स, स्ट्रीट फर्निचर, लाईटिंग, सायनेज, पेडेस्ट्रीयन अंडरपासेस इ. प्रकारच्या कामांचा समावेश असेल, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाचा एक भाग म्हणून अंमलबजावणीसाठी हाती घ्यावा.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** पुनर्नूतनीकरण प्रकल्पाच्या अंमलबजावणीला लवकर सुरुवात करणे शक्य व्हावे म्हणून पहिल्या टप्प्याच्या कामांचा खर्च (अंदाजे रु.३० कोटी) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशा अटींच्या अधीन राहून समप्रमाणात विभागून घ्यावा की, प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेवरील खर्चाचे ओझे कमी करण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय संस्था, अशासकीय संस्था किंवा कॉर्पोरेट हाऊसेस यांच्याकडून थेट वित्तीय अंशदान वा देणग्या प्राप्त करुन त्याद्वारे प्रकल्प अंमलबजावणीमध्ये सार्वजनिक सहभाग मिळविण्यासाठी

प्रयत्न केला जाईल आणि पुनर्नूतनीकरण प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांवरील खर्च बहुतांशी अशा प्रकारच्या स्त्रोतातून भागविण्यात येईल.

**"पुढे आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** पुनर्नूतनीकरण प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचा खर्च (अंदाजे रु.३० कोटी) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राधिकरणाबरोबर समप्रमाणात उचलावा तसेच पुनर्नूतनीकरणानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने स्वखर्चाने या क्षेत्राची उच्च प्रतीची देखभाल व दुरुस्ती करावी अशा सूचना राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस द्याव्यात यासाठी शासनास विनंती करावी.

**"पुढे आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** पुनर्नूतनीकरण प्रकल्पाची जलद गतीने अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पुढील कार्यवाही करण्यास याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याजवळ मौजे मजास येथे भूखंड क्र.१९०/अ/६/१ येथे प्रकल्पग्रस्तांकरीता करण्यात येणा-या कायमस्वरुपी घरबांधणी प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या सल्लागारांच्या अतिरिक्त कामाच्या शुल्कास मंजूरी मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावासंबंधात अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याजवळ मजास येथे प्रकल्पग्रस्तांसाठी कायमस्वरुपी घरबांधणी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे नकाशे, अंदाजपत्रके, भू-परिक्षण अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार म्हणून मेसर्स जी.डी.सांभारे आणि कंपनी यांची रु.२४,९७,९५०/- (५% सेवा कर मिळून) इतक्या शुल्कावर नेमणूक करण्यात आली. त्यांच्या करारनाम्यातील शर्ती व अटींप्रमाणे त्यांनी आर.सी.सी. भिंत व स्लॅब या पध्दतीच्या बांधकामाचा निविदा मसुदा सादर केला. मात्र ब-याच कंत्राटदारांना आर.सी.सी. भिंत व स्लॅब पध्दतीच्या फॉर्मवर्कच्या पध्दतीनुसार काम करण्याचा अनुभव नसण्याची शक्यता गृहीत धरुन व स्पर्धात्मक निविदा याव्या या दृष्टीने निविदाकारांकडून पारंपारिक बांधकामाच्या पध्दतीनुसार तसेच आर.सी.सी. भिंत व स्लॅब या पध्दतीनुसारसुध्दा एक रक्कमी (Lumpsum) निविदा मागविण्यात आल्या. यामुळे मेसर्स जी.डी.सांभारे यांना अतिरिक्त काम करावे लागले. या अतिरिक्त कामासाठी सल्लागारांनी रु.५.७१ लाख इतक्या रकमेची

मागणी केलेली आहे. सल्लागारांच्या मागणीचा विचार करुन तसेच त्यांनी पूर्ण केलेल्या व करावयाच्या अतिरिक्त कामासाठी रु.५.२३ लाख शुल्क (सेवाकरासह) देणे योग्य वाटते.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९१८ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मेसर्स जी.डी.सांभारे आणि कंपनी यांनी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याजवळ मौजे मजास येथे भूखंड क्र.१९०/अ/६/१ येथे प्रकल्पग्रस्तांकरीता करण्यात येणा-या कायमस्वरुपी घरबांधणी प्रकल्पासाठी केलेल्या अतिरिक्त कामाचे शुल्क म्हणून रु.५.२३ लाख (सेवाकरासह) देण्यास मंजूरी देत आहे."

बाब क्र.६ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - तांत्रिक सहाय्य घटक - मुंबईसाठी रस्ता वापर शुल्क आकारणी संबंधीचा अहवाल अद्ययावत करण्यासंबंधी अभ्यास.

६.१ या बाब टिप्पणीसंबंधात महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयुटीपी) संबंधात जागतिक बँकेने सुचविले आहे की, मुंबईतील रस्ते वापरासाठी शुल्क आकारणी करण्यासंबंधात राज्य शासनाने एक धोरण तयार करावे जेणेकरुन रस्त्यांची देखभाल व सुधारणा करण्यासाठी निधी उभारता येईल. अशा धोरणाचा आराखडा तयार करण्यासाठी राज्य शासनाने एक कार्यकारी गट स्थापन केला आहे. या कार्यकारी गटाच्या सूचनेवरुन रस्ते वापर शुल्क आकारणी संबंधात एक अभ्यास हाती घेण्यात आला. या अभ्यासाच्या अहवालावर चर्चा करताना कार्यकारी गटाने सुचविले की, रस्ता वापरासाठी विद्यमान करात वाढ करणे / नवीन कर बसविणे योग्य नाही कारण त्यामुळे मुंबईच्या विकासावर विपरीत परिणाम होईल. तथापि रस्त्यांसाठी तातडीने निधी उभारण्यास कार्यकारी गटाने मान्यता दिली असून अशा प्रकारच्या निधी उभारणीसाठी काही स्त्रोत सुचविले आहेत. यासंबंधात सल्ला देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ उपलब्ध करुन देण्यास जागतिक बँकेने तयारी दर्शविली आहे. दरम्यान

जागतिक बँकेने सुचविले आहे की, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या काही बाबींचा अंतर्भाव करुन, रस्ता वापर शुल्क आकारणीसंबंधीचा अहवाल अद्ययावत करावा. अहवाल अद्ययावत करण्यासाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT), मुंबई ही संस्था योग्य आहे असे दिसून आले आहे. जागतिक बँकेनेही आयआयटीची नेमणूक करण्यास मान्यता दिली आहे. आयआयटीने या अभ्यासासाठी रु.३.० लाख + सेवा कर इतकी फी मागितली आहे. त्यानुसार आयआयटीची नेमणूक करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

६.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९१९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (तीन) आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबईसाठी रस्ता वापर शुल्क आकारणीसंबंधीचा अहवाल अद्ययावत करण्यासाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT), मुंबई या संस्थेची रु.३.० लाख + सेवा कर इतक्या फी वर सोल सोर्स बेसीसवर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधात पुढील कार्यवाही करण्यास कार्यकारी समिती याद्वारे महानगर आयुक्तांना अधिकार प्रदान करीत आहे."

## <u>बाब क्र.७</u> : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ मे, २००४ ते दिनांक ३० जून, २००४.</u>

प्राधिकरणाकडील दिनांक १ मे, २००४ ते दिनांक ३० जून, २००४ पर्यंतच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

## <u>बाब क्र.८</u> : <u>महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर एका सदस्याचे नामनिर्देशन करण्याबाबत.</u>

८.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीनुसार सदर संस्थेचे सह-अध्यक्ष तसेच पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र व सागरी जीवन आणि

भूदृश्य (लँड स्केपिंग) या विषयांतील ३ तज्ञ व्यक्तींची सभासद म्हणून कार्यकारी समितीने नेमणूक करावयाची असते. अशा अशासकीय सदस्यांचा कालावधी ३ वर्षाचा असतो. त्यानुसार श्री.बिट्टू सहेगल, सह-अध्यक्ष आणि श्री.रविंद्र सुळे, सदस्य व श्री.एम.आर.अल्मेडा, सदस्य यांचे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर दिनांक २४ फेब्रुवारी, २००४ रोजी नामनिर्देशन करण्यात आले आहे. तिसरे सदस्य श्री.व्ही.ए.रोडे यांचे नामनिर्देशन दिनांक ३ ऑगस्ट, २००१ रोजी करण्यात आले असून त्यांचा सदस्यत्वाचा कालावधी दिनांक २ ऑगस्ट, २००४ रोजी समाप्त झाला आहे. म्हणून पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र व सागरी जीवन आणि भूदृश्य यामधील तज्ञ असलेल्या एका व्यक्तीचे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त होणा-या सदस्याचे जागी कार्यकारी समितीने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

८.२ यासंबंधात चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, श्री.व्ही.ए.रोडे यांचे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सदस्य म्हणून पुढील तीन वर्षांसाठी पुनर्नामनिर्देशन करण्यात यावे.

८.३ त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९२०</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीतील नियम क्र.९ चे पोट-नियम क्रमांक (अकरा), (बारा) आणि (तेरा) व नियम क्र.१२ आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे श्री.व्ही.ए.रोडे यांचे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सदस्य म्हणून दिनांक ३ ऑगस्ट, २००४ पासून पुढील तीन वर्षांसाठी नामनिर्देशन करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधात आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी समिती महानगर आयुक्तांना याद्वारे अधिकार प्रदान करीत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर नेमणूक करण्याबाबत.</u>**

९.१ या बाब टिप्पणी संबंधात महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणातील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग हे पद दिनांक १ मार्च, २००४ पासून रिक्त झाले असल्याने सदर पद भरण्यासाठी

वर्तमानपत्रांत जाहिरात देण्यात आली होती. तसेच मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग व प्रमुख, नियोजन विभाग या दोन पदांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी / निवड करण्याकरीता एक समिती नियुक्त केली होती. प्राधिकरणाच्या जाहिरातीस अत्यल्प प्रतिसाद मिळून फक्त ११ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले. सेवाप्रवेश नियमानुसार अर्हता, अनुभव व वयाची अट या सर्व बाबींची पूर्तता करणारा फक्त एकच उमेदवार पात्र होता. म्हणून छाननी समितीने सुचविल्याप्रमाणे प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदाकरीता जास्तीत जास्त उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याकरीता अनुभव व वयाची अट शिथिल करण्यास कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली. प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदासाठी निवड समितीने एकूण ६ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. शैक्षणिक अर्हता, अनुभव, पात्रता, योग्यता व मुलाखत या सर्व बाबींचा विचार करुन निवड समितीने एकमताने श्री.यु.व्ही.लुकतुके यांना प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर नियुक्त करावे अशी शिफारस केली. त्यानुसार, शासनाचे मुख्य सचिव व कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांच्या मान्यतेने श्री.लुकतुके यांची प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर दिनांक २.६.२००४ (म.पू.) पासून, कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून, प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर नेमणूक करण्यात आली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केली आहे.

९.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९२१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (एक) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे श्री.यु.व्ही.लुकतुके यांच्या रु.१६४००-४५०-२०००० या वेतनश्रेणीतील प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर दिनांक २ जून, २००४ पासून करण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील उपलेखापाल या पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्याबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, सन १९८४ मध्ये प्राधिकरणातील विविध पदांचे तसेच उपलेखापाल पदाचे सेवाप्रवेश नियम तयार केले आहेत. त्यानंतर उपलेखापाल पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. उपलेखापाल या पदाच्या सध्याच्या सेवाप्रवेश नियमानुसार १२ वी उत्तीर्ण किंवा वाणिज्य विषयासह तत्सम परीक्षा किंवा जी.सी.डी. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांतून ही पदे भरण्याची तरतूद आहे. सन १९८४ मध्ये तयार केलेले उपलेखापाल पदाचे सेवाप्रवेश नियम हे कालबाहय झालेले आहेत. म्हणून उपलेखापाल पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करुन उमेदवार हा वाणिज्य शाखेतील पदवीधर व ३ वर्षांचा अनुभव व संगणकाची माहिती असणे आवश्यक आहे. उपलेखापाल पदाची ४ पदे भरावयाची असल्याने उपलेखापाल पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करावयाच्या अधीन राहून प्राधिकरणाने दिनांक २५ जून, २००४ रोजी वृत्तपत्रामध्ये इतर पदांबरोबर उपलेखापालाची पदे भरण्याकरीता प्रस्तावित सेवाप्रवेश नियमानुसार जाहिरात प्रसिध्द केली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर केली आहे.

१०.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९२२ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील उपलेखापाल या पदाचे सेवाप्रवेश नियम, बाब टिप्पणीत प्रस्ताविल्यानुसार, खालीलप्रमाणे सुधारीत करण्यास कार्यकारी समिती याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे :-

आवश्यक अर्हता :

वाणिज्य शाखेतील पदवी

वय : ३० वर्षे
प्राधिकरणातील कर्मचा-यांना वयाची अट लागू नाही.

अनुभव : ३ वर्षाचा कमर्शिअल अंडरटेकींग मधील अनुभव. संगणकाची माहिती असणे आवश्यक आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आलेल्या अधिका-यांच्या नेमणूकीच्या अटी व शर्ती मंजूर करणेबाबत.**

११.१ या प्रस्तावासंबंधात महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात स्थापन करण्यात आलेल्या प्रकल्प संनियंत्रण कक्षाच्या आस्थापनेवर ३८ पदे निर्माण करण्यास नगर विकास विभागाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार प्राधिकरणाने कार्यकारी अभियंत्यांची ३ पदे व उप अभियंत्यांची ४ पदे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिनियुक्तीवर भरावयाचे ठरविले आहे. प्राधिकरणाच्या विनंतीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून एक कार्यकारी अभियंता व एक दुय्यम अभियंता यांची मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी माहे मार्च, २००३ पासून प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली आहे. त्यानंतर या व्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ३ अभियंता प्रतिनियुक्तीवर प्राधिकरणात रुजू झालेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती प्राधिकरणाकडे पाठविल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीच्या प्रमुख अटी व शर्तीनुसार कार्यकारी अभियंता (स्थापत्य)/उप अभियंता या पदाला अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीतील वेतन अधिक १० टक्के प्रतिनियुक्ती भत्ता देण्यात यावा असे नमूद केले आहे. परंतु शासनाच्या दिनांक ८ जुलै, १९९० च्या निर्णयानुसार शासनातील अधिकारी प्रतिनियुक्तीवर पाठविल्यास संभाव्य वेतनाच्या १०% परंतु दरमहा रु.५००/- च्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने प्रतिनियुक्ती भत्ता मिळतो. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हे दोन्ही प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करावयाचे असल्याने अनुभवी अभियंत्यांची प्राधिकरणास आवश्यकता आहे. तसेच प्राधिकरणाच्या विनंतीनुसार हे अधिकारी प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर आले आहेत. म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविण्यात आलेल्या अटी व शर्ती मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९२३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या / येणा-या अधिका-यांसंबंधातील सोबत जोडपत्र-१ मध्ये

दर्शविलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तींना कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील निर्णयाची अंमलबजावणी करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : रेल्वे वरपूलांच्या संकल्पचित्रांच्या प्रुफ तपासणीकरीता सल्लागाराच्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे.**

१२.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अभ्यासांतर्गत बिगर रेल्वे घटकाखाली सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याकरीता सर्वंकष संकल्पचित्र व अंतिम अभियांत्रिकी आराखडे तयार करण्याचे काम मेसर्स कन्सल्टिंग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. या सल्लागारांस देण्यात आले. या जोडरस्त्यामध्ये इतर बाबींबरोबरच मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर कुर्ला स्थानकाजवळ रेल्वे वरपूल, हार्बर मार्गावर कुर्ला डेअरीजवळ रेल्वे वरपूल व मध्य रेल्वेच्या लोकमान्य टिळक टर्मिनसजवळ दुमजली पूल यांचाही समावेश आहे. मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेसने रेल्वेवरील प्रस्तावित वरपूलांकरीता तयार केलेल्या सामान्य संरचना संकल्पचित्राला (GAD) मध्य रेल्वेने तत्वतः मान्यता दिली. त्यानंतर मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेसने रेल्वे वरपूलांची अभियांत्रिकी संकल्पचित्रे (Designs) तयार केली. मध्य रेल्वेच्या प्रचलित पध्दतीनुसार सदर अभियांत्रिकी संकल्पचित्रांची तिस-या नावाजलेल्या संस्थेकडून प्रुफ तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मध्य रेल्वेने मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् या सल्लागारांची शिफारस केली. सदर सल्लागारांनी काम करण्यास होकार कळवून त्याची फी म्हणून रेल्वे वरपूलांच्या अंदाजित खर्चाच्या ०.५% इतकी फी कळविली. त्यावेळेस रेल्वे वरपूलांची अंदाजित किंमत रु.७.५० कोटी इतकी होती म्हणजे प्रुफ तपासणीचा खर्च रु.३.७५ लाख इतका होता. त्याप्रमाणे मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांनी प्रुफ तपासणीचे काम सुरु केले. तद्नंतर मध्य रेल्वेने असे सुचविले की, मध्य रेल्वेचे कुर्ला स्थानक ते लोकमान्य टिळक टर्मिनस् दरम्यान रेल्वे स्थानकाला जोडण्यासाठी भविष्यकाळातील रेल्वे वाहतूकीच्या गरजा विचारात घेऊन सामान्य संरचना संकल्पचित्रामध्ये (GAD) त्यांचा अंतर्भाव करणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रस्तावाच्या स्थान निश्चयनात सुधारणा केल्यामुळे परिणामस्वरुपी

रेल्वे वरपूलांच्या दोन तलस्तरांच्या सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे यात पूर्ण बदल घडून आले. मध्य रेल्वेने मुख्य रेल्वे मार्गावरील वर्दळीच्या रुळावर ओतीव लोखंडी बांधकामासाठी परवानगी नाकारल्याने सुधारीत सामान्य संरचना संकल्पचित्रे तयार करण्यासाठी सल्लागारांना पुन्हा सांगण्यात आले. त्याप्रमाणे मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेसने सुधारीत सामान्य संरचना संकल्पचित्र (GAD) तयार केले व त्यास मध्य रेल्वेने मंजूरी दिली. सदर रेल्वे वरपूलांची सुधारीत अंदाजित किंमत रु.८.१० कोटी आहे. मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांची प्रुफ तपासणीची फी रेल्वे वरपूलांच्या (ROBs) खर्चाच्या ०.५% म्हणजेच रु.८.१० कोटीच्या ०.५% म्हणून रु.४.०५ लाख + सेवा कर इतकी होते. सदर कामासाठी कंत्राटदाराची आधीच नेमणूक केली असल्यामुळे सुधारीत सामान्य संरचना संकल्पचित्रांची (GAD) प्रुफ तपासणी करुन घेणे अत्यंत निकडीचे होते. म्हणून त्यानंतर महानगर आयुक्तांच्या पूर्व मंजूरीने मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांना रेल्वेवरील वरपूलांच्या सुधारीत संकल्पचित्रे व आराखडयांची (Drawings & Designs) प्रुफ तपासणी करण्याचे कार्यदिश देण्यात आले. अशारितीने मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांनी प्रुफ तपासणी दोन पर्यायी डिझाईनसाठी केलेली असून त्यासाठी एकूण जास्तीत जास्त रु.५.१७५ लाख + सेवा कर इतका खर्च येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाबरोबर केलेल्या करारान्वये या कामासाठी येणारा सर्व खर्च महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने करावयाचा आहे.

**१२.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९२४</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे.शिरीष पटेल आणि असोसिएटस् यांची सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यांतर्गत येणा-या कुर्ला येथील रेल्वेवरील् २ वरपूलांच्या संकल्पचित्रांच्या तपासणीकरीता प्रुफ कन्सल्टंट म्हणून या वरपूलांच्या (ROBs) अंदाजित खर्चाच्या जास्तीत जास्त ०.५% + सेवा कर (जास्तीत जास्त सुमारे रु.५.१७४ लक्ष + सेवा कर) इतक्या फी वर सोल सोर्स बेसिसवर नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रुफ कन्सल्टंटची तपासणी फी अदा करण्याच्या संदर्भातील पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१३ : रेल्वे स्टेशनच्या परिसरातील वाहतूक सुधारणा योजने अंतर्गत घाटकोपर व चेंबूर स्टेशनच्या संकल्पनाचे प्रुफ तपासणीकरीता सल्लागाराची नेमणूक करणे.

१३.१ या प्रस्तावासंबंधात अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अभ्यासांतर्गत रेल्वे स्टेशनांच्या परिसरातील वाहतूक सुधारणा योजनेअंतर्गत ६ रेल्वे स्टेशनांचा समावेश केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देकारांचे दस्तऐवज व स्ट्रक्चरल संकल्पन तयार करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक केली आहे. सल्लागारांनी घाटकोपर व चेंबूर रेल्वे स्थानकांसाठी सामान्य संरचना संकल्पचित्रे तयार केली असून बृहन्मुंबई महानगरपालिका व मध्य रेल्वेने ती मंजूर केली आहेत. तसेच या कामांसाठी सल्लागारांमार्फत अभियांत्रिकी व स्ट्रक्चरल डिझाईन तसेच निविदा तयार करण्याचे काम चालू आहे. प्रचलित रिवाजानुसार स्ट्रक्चरल संकल्पचित्राची प्रुफ तपासणी करणे आवश्यक ठरते. या योजनेचा बराचसा भाग रेल्वे हद्दीत येत असल्यामुळे प्रुफ सल्लागारांच्या निवडीला रेल्वेची मान्यता घेणे आवश्यक आहे. प्रुफ तपासणीसाठी मध्य रेल्वेने सुचविलेल्या सल्लागारांची नावे महानगरपालिकेच्या यादीत नसल्यामुळे व त्यांच्या निवड प्रक्रियेला महानगरपालिका अंतर्गत बराच वेळ लागण्याची शक्यता लक्षात घेता बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्रुफ सल्लागार नेमण्याची विनंती केली आहे. त्यानुसार प्राधिकरणातर्फे मध्य रेल्वेने सुचविलेल्या तीन सल्लागारांकडून निविदा मागविण्यात आल्या. त्यापैकी दोन सल्लागारांनी त्यांचे देकार कळविले आहेत. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या दोन निविदांपैकी सर ओवेन विल्यम्स इनोवेस्टमेंट मर्यादित यांचा वित्तीय देकार खूपच कमी म्हणजे चेंबूर व घाटकोपर रेल्वे स्थानकांच्या योजनेच्या एकूण खर्चाच्या ०.२०५% + सेवा कर असा एकूण अंदाजे रु.३,२२,५८०/- इतका आहे. म्हणून सर ओवेन विल्यम्स इनोवेस्टमेंट मर्यादित यांची नेमणूक करण्यात यावी अशी कार्यकारी समितीला विनंती करण्यात येत आहे. या सल्लागारांचा खर्च सुरुवातीस प्राधिकरण करील व नंतर या खर्चाची वसूली बृहन्मुंवई महानगपालिकेकडून करण्यात येईल.

१३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९२५ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे सर ओवेन विल्यम्स इनोवेस्टमेंट मर्यादित यांची चेंबूर व घाटकोपर रेल्वे स्टेशनच्या परिसरातील वाहतूक व्यवस्था सुधारणा योजनेच्या (SATIS) स्ट्रक्चरल संकल्पचित्रांच्या तपासणीकरीता प्रुफ सल्लागार म्हणून या योजनेच्या एकूण खर्चाच्या ०.२०५% + सेवा कर इतक्या फी साठी नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रुफ सल्लागाराच्या नेमणूकीकरीता पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१४ : **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) – महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे कामांची अंमलबजावणी करण्यासंबंधात करारपत्रास अंतीम स्वरुप देणे.**

१४.१ या प्रस्तावाची माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या (एमयुआयपी) बृहत योजनेस (Master Plan) प्राधिकरणाने तसेच राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या बृहत योजनेनुसार प्राधिकरणाने कामांची अंमलबजावणी हाती घेतली आहे. मुंबईतील उड्डाणपूल तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या बांधकामाचा अनुभव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास असल्यामुळे एमयुआयपीमधील काही महत्वाच्या कामांसाठी या महामंडळाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील (एमयुटीपी) जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता व सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता यांची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सुरु असून त्यासाठी महाराष्ट्र शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामध्ये एक त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे.

या करारानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास त्यांनी हाती घेतलेल्या कामांच्या एकूण खर्चाच्या २.७६% इतकी रक्कम एजन्सी चार्जेस म्हणून द्यावयाची आहे. तथापि एमयुआयपीमधील कामांच्या अंमलबजावणी संबंधात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कळविले आहे की, एमयुटीपीसंबंधातील व्यवस्थेमध्ये व एजन्सी चार्जेसमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. यासंबंधात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाशी चर्चा केली. या चर्चेनुसार असे प्रस्तावित करण्यात येत आहे की, एमयुआयपीमधील कामांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास त्यांच्या कामांच्या ५% इतकी रक्कम एजन्सी चार्जेस म्हणून देण्यात यावी. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासंबंधातील त्रिपक्षीय करारातील इतर अटींमध्ये कोणताही बदल न करता एमयुआयपी संबंधात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाबरोबर करार करण्यात येईल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, एमयुआयपीअंतर्गत ९ उड्डाणपूलांचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास देण्याचा प्रस्ताव असून या कामांचा एकूण अंदाजित खर्च सुमारे रु.१५८ कोटी इतका आहे.

१४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९२६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ च्या उपकलम (३) चे पोटकलम (दोन) व (तीन) आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील सोबत जोडलेल्या जोडपत्र-२ मधील कामांसाठी प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नेमणूक करण्यास मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासंबंधात राज्य शासन, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेमधील त्रिपक्षीय करारपत्रातील, एजन्सी चार्जेस वगळून, इतर सर्व अटी व शर्तीनुसार मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील कामांची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अंमलबजावणी करावयाच्या कामांच्या एकूण खर्चाच्या ५% इतकी रक्कम एजन्सी चार्जेस म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळास देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून या ठरावाची अंमलबजावणी व पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——

जोडपत्रे १ व २

जोडपत्र - १

# बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. एस.पी.जोशी, यांची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा अखत्यारितील मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर प्रतिनियुक्ती करण्याबाबतच्या अटी व शर्ती.

१) बृहन्मुंबईतील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदाला अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीतील वेतन अधिक १० टक्के प्रतिनियुक्ती भत्ता देणे. महागाई भत्ता अर्धा वेतन अधिक दरमहा वैद्यकीय सहाय्य अधिक वाहनभत्ता अधिक घरभाडे भत्ता (मूळ वेतनाच्या १० टक्के) अधिक प्रवास अर्थ सहाय्य भत्ता रु. ७५/- आणि इतर वेळोवेळी अनुज्ञेय असलेले भत्ते व सुविधा (बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्य केल्याप्रमाणे) वेळोवेळी अनुज्ञेय असलेले इतर भत्ते व सुविधा राज्य सरकारने द्यावे.

२) कर्मचारी जर ज्येष्ठताक्रमानुसार अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे निवड झाल्यामुळे पदोन्नत झाला तर राज्य सरकार त्यांना दरमहा त्यांच्या वरिष्ठ पदावरचे वेतन व भत्ते अधिक १० टक्के प्रतिनियुक्ती भत्ता देण्यास अनुमती देईल.

३) बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावली ११८१ (जोडपत्र १) नुसार व वेळोवेळी त्यात झालेल्या सुधारणांना अनुसरुन राज्यसरकारने बृहन्मुंबई महानगरपालिकेला रजा अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान, रजेच्या अखेरीपासून १५ दिवसाचे आत द्यावे लागेल अन्यथा दर दिवशी १०० रु. ला दोन पैसे या दराने १५ दिवसाच्या पुढील कालावधीपासून अधिदानाच्या दिवसापर्यंतच्या कालावधीचे व्याज द्यावे लागेल.

४) श्री.एस.पी.जोशी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना रजा वटवण्याची इच्छा दर्शविल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावली ११८१ नुसार त्यांना अर्जित रजा वटाव अधिदान देण्यात यावे.

५) कर्मचारी राज्य सरकारच्या सेवेत असताना त्याला दुखापत झाली व तो दुखणे कर्मचारी परत महानगरपालिकेच्या सेवेत आल्यावर उद्भवले तरी कर्मचा-याला दुखापत रजेचे अनुदान राज्य सरकारने करावे.

६) सेवा शर्तीमध्ये झालेल्या सुधारणा व सोयी उदा. वैद्यकीय सुविधा वगैरे यांचा संपूर्ण अथवा अंशतः फायदा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संमतीने व राज्य सरकारच्या मंजूरीने कर्मचा-याला देण्यात यावा.

७) राज्य सरकारकडील प्रतिनियुक्ती व महानगरपालिकेतील पदोन्नती या दोन्ही वेळेच्या नियुक्तीच्या वेळी वेतन, भत्ते व प्रवासभत्ता इ. खर्च राज्य सरकारने सोसावा.

८) बृहन्मुंबई महानगरपालिकेत अनुज्ञेय असलेले सानुग्रह अनुदान, प्रवास सहाय्य भत्ता, मुलांची शिष्यवृत्ती व इतर सुविधांवर राज्य सरकारकडील प्रतिनियुक्तीच्या काळातही तवच राहील.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार महानगरपालिका कर्मचा-यांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी रजा प्रवास सहाय्य भत्ता मिळतो. कर्मचा-याच्या विनंतीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार कर्मचा-याला अनुज्ञेय असलेला रजा प्रवास सहाय्य भत्ता राज्य सरकारने द्यावा. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विचारणा झाल्यास अशा सवलती व सुविधांचा यथाप्रमाणे परत भरणा राज्य सरकारने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे करावा.

९) बृहन्मुंबई महानगरपालिका नियमाप्रमाणे जानेवारीपासून सुरु होणा-या दिनदर्शिका वर्षात कर्मचा-याला अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजा अथवा राज्य सरकारच्या नियमाप्रमाणे असतील त्या नैमित्तिक रजा राज्य सरकारने कर्मचा-याला द्याव्या.

१०) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यभार हस्तांतरीत केल्यापासून परसेवा कालावधी सुरु होईल व महानगरपालिकेतील कार्यभार परत स्विकारल्यावर संपेल.

११) सुरवातीला प्रतिनियुक्तीचा कालावधी १ वर्षाचा असेल आणि राज्य सरकारच्या विनंतीनुसार तो पुढे वाढविता येईल.

१२) कर्मचा-यांची परत बृहन्मुंबई महानगरपालिकेत परत येण्याची इच्छा असल्यास त्यांनी तशी लेखी सूचना दिल्यापासून सहा महिन्याच्या कालावधीत कर्मचारी परत येऊ शकेल. मात्र बृहन्मुंबई महानगरपालिका त्याला तातडीने परत बोलावू शकते. बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचा-याला केव्हाही परत बोलावून घेऊ शकते.

१३) जर राज्य सरकारला कर्मचा-याला परत पाठवावयाचे असेल तर त्यांना १ महिन्याची लेखी सूचना देणे आवश्यक आहे.

१४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या सेवेत असताना त्याला कायम स्वरुपात विकलांग झाल्यास अथवा मृत्यू झाल्यास नियमानुसार अनुज्ञेय असलेली भरपाईच्या रकमेचे अनुदान राज्य सरकारने करावे.

परिपत्र २

~~Annexure-II~~

# List of works to be implemented by MSRDC

| Name of Road | Flyovers on at | Block Estimated Cost (in Rs. Cr.) |
|---|---|---|
| Western Express Highway; | Kherwadi, | 20.00 |
| | Domestic Airport (Vile Parle), | 24.00 |
| | Duplication of flyover at Goregaon-Mulund Link Road Junction (Dindoshi Depot) | 8.50 |
| | Times of India (Malad), | 11.00 |
| | Thakur Complex | 27.83 |
| Eastern Express Highway; | Suman Nagar | 18.96 |
| SV Road | Extension of Andheri ROB on Dhake Road across S V Road, | 12.00 |
| | ROB on W. Rly and flyover along JVLR Ext. | 9.35 |
| Dr. Ambedkar Road | Doubling of Sion, | 25.68 |
| Total | | 157.32 |